# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६.०२.२०२१**

## जिल्हा : कोल्हापूर

| मागील आठवड्यातील हवामान (२०.०२.२०२१ ते २६.०२.२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२७.०२.२०२१ ते ०३.०३.२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | दिनांक | २७ | २८ | ०१ | ०२ | ०३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २८.८ | २९.९ | २९.८ | ३०.५ | ३३.५ | ३४.५ | ३३.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३५ | ३६ | ३६ | ३५ | ३४ |
| १६.९ | १६.४ | १४.२ | १४.० | १८.४ | १८.० | १७.८ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २३ | २२ | २२ |
| ० | २ | २ | ३ | ३ | २ | ३ | स. ढग स्थिती (आकाश) | २ | ० | २ | २ | २ |
| १ | १ | २ | ० | १ | २ | - | दु. | | | | | |
| ७६ | ८८ | ८८ | ८२ | ९६ | ८९ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४७ | ४७ | ३१ | ७० | ८५ |
| ५० | ५१ | ६७ | ६४ | ३३ | ३४ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २३ | १४ | ११ | १४ | १९ |
| ४.६ | ४.६ | ४.८ | १०.२ | ६.२ | ६.१ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | १० | ८ | ५ | ५ |
| ई. | पु. | उ. | ई. | आ. | प. | प. | स. वाऱ्याची दिशा | आ. | उ.ई. | पु.ई | आ. | पु.आ. |
| पु. | नै. | ऊ. | पु. | पु. | ई. | - | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२१ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२१ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | २४.८ | २ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यात जिल्ह्यात दिनांक २७ फेब्रुवारी ते ०३ मार्च दरम्यान हवामान मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३४.० ते ३६.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २२ ते २३ अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते १० कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ फळबाग तसेच रब्बी पिकांना आवश्यकतेनुसार पाण्याची उपलब्धता करावी. |
| **संदेश** | | ➢ पक्व गहू, रब्बी ज्वारी व हरभरा पिकांची काढणी करून मळणी करावी व तयार शेतीमाल उन्हामध्ये वाळवून सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| **गहू** | पक्वता | ➢ लवकर पक्व होणाऱ्या गहू पिकाची कापणी पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी त्यामुळे गव्हाचे दाणे शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही. कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % असावे. |
| **रब्बी ज्वारी** | पक्वता | ➢ पक्व झालेल्या ज्वारी पिकाची काढणी करावी. काढणी केलेली कणसे उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठवणुकी पूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी. |
| **हरभरा** | पक्वता | ➢ हरभरा पिक ११० ते १२० दिवसांत तयार होते. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करावी. यांनतर धन्यास ६ते७ दिवस कडक ऊन द्यावे व सुरक्षित ठिकाणी साठवून त्यामध्ये कडूनिंबाचा पाला (५%) घालावा त्यामुळे कीड लागत नाही. |
| **ऊस** | लागवड | ➢ ऊस खोडवा व्यवस्थापनाकरिता उस तोडणी झाल्यानंतर शेतात उरलेले उसाचे पाचट जाळू नये. किड, रोग व तणग्रस्त लागण क्षेत्र असल्यास खोडवा ठेऊ नये.<br>➢ सर्वसाधारणपणे १५ फेब्रुवारी पर्यंत तुटलेल्या ऊसाचाच खोडवा ठेवावा. त्यानंतर घेतलेल्या खोडवा ऊसावर खोड किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होतो.<br>➢ खोडवा उसामध्ये गवताळ वाढीची बेटे दिसून आल्यास त्वरित काढून नष्ट करावीत. |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | पूर्वहंगामी | ➢ फेब्रुवारीमध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ५.४९ मी.मी. प्रती दिवस एवढा असतो त्यामुळे ऊस पिकास प्रती दिवस ३.२७ लिटर पाण्याची गरज असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४लिटरचा ड्रीपर) दररोज ४९ मिनिटे चालू ठेवावा. |
| **कांदा** | वाढीची | ➢ कांद्यावरील फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % ई.सी. १५ मि.ली. किंवा ल्यॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५ % ई.सी. ६ मि.ली. या कीटकनाशकांच्या प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| | वाढीची | ➢ रांगडा हंगामातील कांदा काढणीस तयार झाला असल्यास तीन आठवडे आधी कांद्याचे पाणी बंद करावे. |
| **रताळी** | लागवड | ➢ संरक्षित पुरेश्या पाण्याची उपलब्धता असल्यास उन्हाळी रताळी लागवड करावी. लागवडीसाठी वर्षा, कोंकण अश्विनी, सम्राट आणि कालमेघ या वाणांचा वापर करावा. |
| **वांगी** | लागवड | ➢ उन्हाळी हंगामामध्ये वांग्याची लागवड फेब्रुवारी ते मार्च महिन्यात पूर्ण करावी. लागवडीसाठी मांजरी गोटा, फुले हरित, कृष्णा (संकरीत), फुले अर्जुन (संकरीत) या वाणांची निवड करावी. |
| **काजू** | मोहर अवस्था | ➢ काजूवर ढेकण्या (टी मॉसकिटो) किडीचा प्रादुर्भाव झाल्यास लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ % प्रवाही ६ मि.ली. प्रती १० ली. पाण्यात मिसळून पालवी फुटण्याच्या वेळी फवारणी करावी. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ जनावरांच्या चाऱ्यासाठी संकरीत नेपियर गवताची लागवड करावी त्यासाठी फुले जयवंत व फुले गुणवंत या वाणांचा वापर करावा.<br>➢ हिवाळ्यामध्ये शेळ्या शक्यतो सूर्योदयानंतर गवतावर दव नसताना चारावयास न्याव्यात कारण दव पडलेल्या गवतावर शेळ्या चारल्यास शेळ्यांना सर्दी, फुफ्फुस दाह व घश्याचे आजार होण्याची शक्यता असते. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर
ठिकाण : २६.०२.२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**